**फौजदारी किरकोळ अर्ज.क्र.३५/२०२६ मधील नि.क्र.०१ खालील आदेश**

(CNR No.MHLA060004612026)

प्रस्तुतचा अर्ज आरोपी अर्जदार अजय पि. मधुकर गुरुडे यांनी बी.एन.एस.एस. चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केला आहे. अर्जातील मजकुर असा की, अहमदपूर पोलीसांनी गु.र.नं.९१/२०२६ मधील भारतीय न्याय संहितेचे कलम ३०३ (२), ३ (५) व पर्यावरण संरक्षण अधिनियमचे कलम १५ मध्ये त्यांचे मालकीचे टाटा टिप्पर मॉडेल नं.एलपीके २५१८ वाहन जिचा क्रमांक एम.एच.२४ ए यु २०७९ असुन सदर गाडीचे वर्णन पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| रजिस्ट्रेशन नंबर | :- | एम.एच.२४ ए यु २०७९ |
| चेसिस नंबर | :- | MAT448066FAJ10971 |
| इंजिन नंबर | :- | 51H84249010 |

२. सदर वाहन अर्जदार यांचे मालकीचे असुन व्यावसायिक वापरासाठी सदर वाहनाची गरज असते. करीता वाहनाचा ताबा मिळणेकरीता अर्ज केला आहे.

३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी अर्जास हरकत घेतलेली आहे. निशाणी ०५ कडे तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणे नमुद गुन्हयात जप्त वाहन हे अवैध पध्दतीने गौण खनिज वाळु वाहतुकीसाठी वापरले आहे. आरोपी सदर वाहनाचा वापर परत अशाच प्रकारच्या गुन्हयात करु शकतो तसेच तो सदर गाडीत बदल करु शकतो म्हणून सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

४. अर्जदाराने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र दिलेले असुन, प्रथम खबरी अहवालाचे सत्यप्रत, वाहनाच्या आर.सी. टी.सी. बुकची सत्यप्रत, आधारकार्डची सत्यप्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहे. आरोपी अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तो वाहन क्र. एम.एच.२४ ए यु २०७९ चा मालक असल्याचे प्रथमदर्शन सिध्द होते.

५. सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये ठेवून त्याचे नुकसान होणार आहे. सदर वाहनाचा मालक असलेबाबत आरोपी अर्जदाराने योग्य तो पुरावा दिला आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज काही शर्तीवर व अटीवर मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार यांना अहमदपूर पोलीसांनी गु.र.नं.९१/२०२६ भारतीय न्याय संहीतेचे कलम ३०३ (२), ३ (५) व पर्यावरण संरक्षण अधिनियमचे कलम १५ अन्वये अर्जदार यांचे मालकीचे टाटा टिप्पर मॉडेल नं.एलपीके २५१८ वाहन जिचा क्रमांक एम.एच.२४ ए यु २०७९ हे निरक्षणग्राही बंधपत्र (अंतरिम ताबा) म्हणून रु.३०,००,०००/- (रुपये तीस लाख फक्त) घेवुन ताबा देण्यात येतो.

३. सदर केसचा निकाल लागेपर्यंत सदर वाहनाचे मूळ स्वरुप, रंग बदलणार नाही अथवा कोणासही हस्तांतरित अथवा तबदिली करणार नाही तसेच या न्यायालयास आवश्यकता वाटल्यास न्यायालयाचे आदेशान्वये जप्त वाहन न्यायालयात हजर ठेवण्याचे अटींवर देण्यात यावी.

४. अर्जदार या न्यायालयाने अथवा या न्यायालयाची वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्देशावरुन उपरोक्त नमुद वाहन हजर करण्यास असमर्थ ठरल्यास रक्कम रु.३०,००,०००/- (रुपये तीस लाख फक्त) या न्यायालयात भरण्यास पात्र राहील.

५. तपासीक अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराचे ताब्यात देतेवेळी अर्जदाराच्या खर्चाने सदर जप्त वाहनाचे फोटो काढावे, फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व दोन पंचासमक्ष पंचनामा करुन तिच्या अंतरिम ताब्यात देण्यात यावा. सदर पंचनामा व फोटो न्यायालयात दाखल करावे.

६. अर्जदार यांनी स्वखर्चाने वाहनाचा मुळ नोंदणी क्रमांक वाहनावर लावावा. तपासीक अधिकारी यांनी वाहनाचा मुळ क्रमांक वाहनावर लावलेला आहे याची खात्री वाहन वाहन देतेवेळी करावी.

७. अर्जदाराने प्रस्तुतचे वाहनाची अद्ययावत विमाछत्र असल्याबाबतची पावती न्यायालयात दाखल करावी.

८. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.03.13 17:26:16 +0530

दि.१३.०३.२०२६

**(एम.सी. हासगे)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट क्र.०२) अहमदपूर.